महाराष्ट्र शासन
कार्यालय- जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त छत्रपती संभाजीनगर
जिल्हा पशुवैद्दकिय सर्वचिकित्सालय परिसर, खडकेश्वर
छत्रपती संभाजीनगर
Phone – 0240/2343260 Email - ddcahaurangabad@gmail.com

जा.क्र. जिपसंउआ/छ.सं /जिकृरेकें/द्रवनत्र वाहतुक दरपत्रक/२१२६/२०२५, छ. संभाजीनगर दि. १४/०६/२०२५

## द्रवनत्र वाहतुक दरकरार सन २०२५-२०२६ साठी नियम व अटी

खाजगी मालवाहतुक करणा-या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून छ. संभाजीनगर जिल्हयातंर्गत व आवश्यकता भासल्यास राज्यातील इतर जिल्हयातून अथवा राज्याबाहेरून द्रवनत्र व विर्यमात्रा जिल्हयातील १२३ पशुवैद्यकीय संस्थाना पुरवठा करण्यासाठी द्रवनत्र पात्रांचे वाहतुकी करीता दिनांक ०१ जुलै २०२५ ते ३० जून २०२६ या कालावधी करीता अंदाजे १.५ मे टन /४५ द्रवनत्र पात्रे वाहतूक क्षमता असलेल्या व चटई क्षेत्र ६५ चौ.फुट असलेले (मिनी ट्रक/वाहन ४०७) वाहनाचे प्रति किलोमीटर दराकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. द्रवनत्र वाहतूक दरकरार संबधी संपूर्ण सूचना, नियम व अटी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, छ. संभाजीनगर येथे सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत व छ.संभाजीनगर जिल्हयाचे संकेत स्थळ http://chhatrapatisambhajinagar.maharashtra.gov.in तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकृत संकेतस्थळ http://dahd.maharashtra.gov.in वर दिनांक १९ जून २०२५ पासून पहावयास उपलब्ध असतील.

## द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतुकीकरिता पूरकमाहिती

| अ.क्र. | जिल्हा अंतर्गत व जिल्हयाबाहेर व परप्रांतातसुध्दा | वाहनाची क्षमता | दरमहा होणारे अंदाजे अंतर कि.मी. | १ वर्षात होणारी वाहतूक अंदाजे अंतर कि.मी. | सध्याचा दर प्रति कि.मी.रुपये | १ वर्षात होणारी अंदाजे मुल्य रूपये | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मिनी ट्रक /वाहन ४०७ | अंदाजे १.५ मे.टन/४५ द्रवनत्र पात्रे | १८०० | २२००० | २६.८५ | ५९०७००/ | ०१.०७.२०२५ ते ३०.०६.२०२६ |

## दरपत्रक सादर करण्यासंबधीचे वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रक सुचना प्रसिध्द दिनांक | १९.०६.२०२५ | सकाळी ११.०० वाजता |
| २. | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक | १९.०६.२०२५ते २६.०६.२०२५ | कार्यालयीन वेळेत |
| ३. | दरपत्रक समितीसमोर दरपत्रके उघडण्याचा दिनांक | २७.०६.२०२५ | दुपारी०३.००वाजता |

**क्र.१- तांत्रिक लिफाफयातील सहपत्रे-**

१. निविदेच्याअटीवशर्तीमान्यअसल्यासचेस्वाक्षरीने सदरप्रपत्रभरावेत.

२. बयाणारक्कम (call deposit) रुपये५,०००/- (अक्षरीरुपयेपाचहजार ) धनाकर्ष स्वरूपात जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त छ संभाजीनगर यांच्या नावे जमाकरणे आहे.

३. वाहनासंबधीचेकागदपत्रे- निविदाधारकाने वाहन व व्यवसाय संबंधीच्या खालील कागद पत्राच्या सत्यप्रती स्वसाक्षार्कीत करून सादरकरणे आवश्यक आहे. आणि सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी पडताळणी करीतासोबत आणणे बंधनकारक आहे.

१. वाहना चे रजिस्ट्रेशन बुक व टॅक्स बुक, पी. यू. सी .
२. मालवाहतुकी चा परवाना,
३. वाहतुकीच्या वाहनाचासरसकट अद्यावत विमा काढलेला प्रमाण पत्र
४. पासिंग (वाहन नोंदणी) वर्ष व मुदती बाबत चा तपशील
५. रहिवासी दाखला
६. वाहन चालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स (परवाना)
७. रोड टॅक्स भरल्याची पावती
८. पॅन कार्ड (वाहन मालकांचे)
९. आधार कार्ड (वाहन मालकांचे)
१०. आयकर भरणा विवरण पत्र मागील वर्षाचे
११. सर्टिफिकेट ऑफ फिटनेस (फोर्म नंबर ३८)
१२. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

तांत्रीक लिफायफयांमधील सर्व कागदपत्राची पूर्तता व पडताळणीअंती योग्य असणा-या निविदाधारकाचेच व्यवसायीक/ व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.

**क्र.२ –व्यापारी प्रपत्र –**

वाहतूक कंत्राटदारा ठेकेदाराने आपले दर प्रती किलोमीटरप्रमाणे द्यावे .तसेच दर नमूद करतांना सर्व करासहीतचा दर नमूद करावा.वाहनाचाप्रतिकि.मी. दरअक्षरीवअंकीनमुदकरावा

### सर्वसाधारण अटी व शर्ती

१. दर पत्रक संच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालीयीन वेळेत दि.१९.०६.२०२५ ते २६.०६.२०२५ दुपारी 3.00 वाजेपर्यंत विक्रीस उपलब्ध करून ठेवण्यात आलेली आहे. संबंधित इच्छुक निविदा धारकांनी रु. 500/- रोखीने भरून प्रमाणित दरपत्रक संच खरेदी करावे व विहित कालावधीत उपरोक्त संच भरून तांत्रिक व व्यवसाय लिफाफा सादर करावा. फक्त प्रमाणित केलेले दर पत्रक संचच पुढील प्रक्रीयेसाठी ग्राह्य धरण्यात येतील. तथापि नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उदयोगांना, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना वलोकसेवा केंद्राना प्रमाणित केलेले दर पत्रक संच मोफत दिले जातील .

२. द्रवनत्र वाहतूक व पुरवठयाकरिता वापरण्यात येणारे वाहन हे सुस्थितीत असावे व तो दरपत्रक धारकाच्या स्वतःच्या मालकीचे असावे.

३. वाहन हे टाटा ४०७ किंवा तत्सम इंधन क्षमतेचे व चटई क्षेत्र ६५ चौ.फूट असलेले असावे. वाहतूक कंत्राटदाराने आपलेदर प्रतीकिलोमीटर प्रमाणे मुक्कामांच्या दरांसह देण्यांतयावे. तसेच वाहनास ऊन, वारा, पाऊसयापासून द्रवनत्रपात्रे सुरक्षित राहतील याकरीता छत (हूड) ठेवावे लागेल व वाहनास द्रवनत्रपात्रांखाली रबर मॅटींग लावावे लागेल.

४. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी समितीसमोर तपासणीसाठी वाहन ठेवावे लागेल.वाहन तपासणीसाठी उपलब्ध नसेल तर संबंधिताचे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

५. वाहतूक कालावधीत मुक्काम झाल्यास मुक्कामाचे स्वतंत्रदर दिले जाणारनाही.

६. ज्या निविदाधारकाचे प्रति किलोमिटर दर सर्वात कमी असतील त्यास सर्वप्रथम काम करण्याचे contract प्रदान केले जाईल.

७. दर निश्चित करताना जर दोन किंवा त्यापेक्षा जास्त कंत्राटदारांचे दर सारखे आले तर वाहनांचा प्रकार, उपलब्धचटईक्षेत्र पाहूनसमिती अंतीम निर्णय घेईल व तो निर्णय सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

८. यशस्वी निविदा धारकास निवीदा मंजुर झाल्यापासुन दहा दिवसांच्या आत 12000/- रुपये (अक्षरी- बारा हजार रुपये फक्त) रक्कमसुरक्षा ठेव म्हणून राष्ट्रीय कृत बँकेच्या एफडीआर द्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, छ संभाजीनगर यांचे नावे ठेवावे लागतील. तसेच वाहतुकीच्या कार्य कृतिची हमीपूर्ण करणे बाबतचा करारनामा नियमानुसार १०० रुपयाच्या स्टँप पेपर वर लिहुन दयावा लागेल वकरारनामा करून द्यावा लागेल. या कार्यालयाच्या वतीने सहाय्यक आयुक्त , जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, छ.संभाजीनगर यशस्वी निविदाधारक यांचे सोबत करारनामा करतील. त्याशिवाय वाहतुकीचे कंत्राट मंजुर केले जाणार नाही.

९. निवड झालेल्या कंत्राटदारानेजर काम करण्याचे नाकारले तर त्याने भरलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल व त्यानंतरच्या अनुक्रमा नुसारअसणाऱ्या निविदाधारकाला L1 च्या दराप्रमाणे काम करण्यास संधी देण्यात येइल

१०. जे निविदाधारक दुसऱ्या क्रमांकावर राहतील त्याची अनामत रक्कम एक महिन्याच्या अंतराने परत करण्यात येईल व इतरांचीअनामत रक्कम ताबडतोब परत करण्यात येईल.

११. वाहनाची क्षमता एकावेळी कमीत कमी २४ टीए-५५ द्रवनत्रपात्रांची असावी तसेच फळया टाकून दुमजली करुनपात्रांचो वाहतूक एकूण ४५ द्रवनत्र पात्रे होईल अशी व्यवस्था वाहनात बदल करुन करावी लागेल. त्या फळयांवर सुध्दा बेडींग करावी लागेल बेडींग न केल्यास कंत्राट रद्द करण्यांत येईल. दोन मजल्यांमध्ये वाहतूक करणे आवश्यक आहे.

१२. द्रवनत्रपात्र वाहतुकीच्या वेळेस गाडीचा वेग दरताशी ३० ते ३५ किमी. पेक्षा जास्त राहू नये. जास्त वेगाने गाडी नेल्यास होणा-या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी वाहतूक कंत्राटदारावर राहील.

१३. वाहनामध्ये चालकाचे जवळ दोन व्यक्ती बसण्याची व्यवस्था असावी व वाहुकीच्या वेळेसकार्यालयाचे एक किंवा दोन प्रतिनिधी सोबत राहतील.

१४. द्रवनत्र(LN२)हा अति थंड अवस्थेत (-१९६डिग्रीसेल्शीअस) असलेला पदार्थ आहे. वातावरणाशी द्रवनत्राचा संबंध येताच वाफेची निर्मीती होते व ती सुध्दा अतिथंड असते. यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी याची माहिती/नोंद कंत्राटदाराने घ्यावी. तसेच वाहन चालक, मदतनीस यांना याबाबत अवगत करावे. अपघात झाल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात येणार नाही.

१५. वाहन वाहतुकीच्या सेवेत असतांना वाहनाची हालचाल वाहनासोबत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या आदेशाप्रमाणे करावी लागेल. वाहनात खाजगी सामान किंवा इतर प्रवाशांची वाहतूक करता येणार नाही. तसेच वाहन चालक यांची वर्तणूक चांगली असावी. दारु पिऊन वाहन चालवू नये तसे केल्यास मंजूर करार खंडीत करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना राहतील.

१६. वाहतुकीच्या वेळी संबधीत वाहनासोबत वाहनाची कागदपत्रे ठेवणे बंधनकारक राहील. तसेच वाहनावर **"महाराष्ट्र शासनाच्या सेवेत"** असा फलक फक्त या कार्यालयाचे कामकाज करतानाच लावणे आहे.

१७. वाहनात द्रवनत्रपात्र चढविणे, उतरविणे व उपकेंद्रापर्यंत पोहचविण्यासाठी कंत्राटदाराला मदत करावी लागेल. त्याकरीता वेगळा दर आकारता येणार नाही. तसेच रात्रीच्या मुक्कामाचा वेगळा दर आकारता येणार नाही.

१८. वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत कंत्राट दाराला सर्वसाधारणत १२ तासा पुर्वी सुचना देण्यात येईल. आकस्मिक परिस्थितीत वेळेवर वाहन बोलविण्यात येईल, त्यावेळी वाहन उपलब्ध करावे लागेल. पूर्वसूचना देवूनही वाहनउपलब्ध करून देण्यास कंत्राटदार टाळाटाळ करत असल्यास कंत्राटदारास प्रत्येक वेळी ५०००/- दंड आकारण्यातयेईल व तो दंड त्यांच्या देयकातूनवसूल करण्यात येईल.

१९. वाहतुकी दरम्यान द्रवनत्र पात्राच्या सुरक्षिततेची जबाबदारी कंत्राटदारांची राहील वाहतुकीच्या काळात शासनाच्या मालमत्तेचेनु कसान झाल्यास त्यांची भरपाई करून देण्यास कंत्राटदार जबाबदार राहीलप्रत्येक .वाहतुकीच्या वेळी द्रवनत्र पात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील त्यामुळेत्यांची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकावर निश्चित राहील. वाहतुकीच्या वेळी मालकाने किंवा वाहन चालकाने किंवा त्याच्या व्यक्तीकडुन द्रवनत्र पात्रे हाताळताना निष्काळजी पणा झाल्यास व द्रवनत्र पात्राची तुटफुट होऊन नुकसान झाल्यास नुकसानी ची किंमत कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल.

२०. द्रवनत्र वाहतुकीचे मार्गावर कृत्रिम रेतन उपकेंद्राचे शासकीय सामान असेल तर ते विनामूल्य वाहतूक करावे लागेल ते त्याला बंधनकारक राहील.

२१. द्रवनत्र वाहतुकीच्या वेळेस पथकर/ टोलटॅक्स व इतर शासकीय सर्व टॅक्स वाहतुक कंत्राटदारास द्यावा लागेल.

२२. आवश्यकता भासल्यास ज्या कंपनीसोबत द्रवनत्र खरेदीचा भावबंद करार होईल तेथून द्रवनत्र आणावा लागेल. इतर राज्यातून द्रवनत्र व जनावरे आणण्याकरीता आर.टी.ओ.चे लायसन्स/परमीट प्राप्त करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच अत्यावश्यक आणीबाणीच्या परिस्थितीत द्रवनत्र महाराष्ट्र किंवा इतर राज्यातील अन्य कंपनीकडून

आणावा लागेल.

२३. द्रवनत्र पुरवठयाकरीता ज्या ज्या वेळेस हे कार्यालया वाहनाची मागणी करेल त्या त्या वेळेस कंत्राटदारास वाहन पुरविणे बंधनकारक राहील. जर नमूद वेळेत वाहन पुरवू शकले नाही. तर हे कार्यालय बाजारात उपलब्ध असलेल्या दराने वाहन मागवून द्रवनत्र पुरवठा करेल व दरामधील फरक वाहतूक कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल. वाहन पुरविण्यास वारंवार खोळबां निर्माण झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल. ज्या वाहनासाठी दरकरार मंजूर झाला आहे त्याच क्रमांकाचे वाहन कंत्राटदारास द्रवनत्र पुरवठा करतेवेळी वापरावे लागेल, अन्यथा कार्यवाहीस पात्र राहील.

२४. द्रवनत्र पुरवठा हा प्रत्येक मार्गावरील उपकेंद्रांना वेळेवर होण्याचे दृष्टीने वाहन या कार्यालयात सकाळी सूचित केलेल्या वेळेवर आणावे लागेल. वाहनाचे मिटर चालू असणे आवश्यक आहे. काही कारणास्तव मीटर बंद झाले तर त्वरीत दुरुस्त करुन घ्यावे लागेल व त्या कालावधीपर्यंत प्रत्येक मार्गाचे असलेले ठराविक कमीत कमी अंतराचे देयक मंजूर करण्यात येईल.

२५. १ जुलै २०२५ ते ३० जून २०२६ या कालावधीत डिझेल इंधन इत्यादीची भाववाढ झाली तरी मंजूरदरात कोणतीही दरवाढ मिळणार नाही.

२६. वाहतुकीची देयके किलोमीटर रीडींग प्रमाणे स्विकारली जातील. छ संभाजीनगर मुख्यालयातून (जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, खडकेश्वर,छ संभाजीनगर) निघतांना प्रथम किलो मीटर रीडींग घेतली जाईल व नंतर प्रवास पूर्ण झाल्यावर छ संभाजीनगर मुख्यालयी परत आल्यानंतरची किलो मीटर रीडींग घेतली जाईल व त्याप्रामणे देयकांची रक्कम अदा केली जाईल. महिना संपल्यानंतर महिन्यात झालेल्या पूर्ण वाहतूक प्रवासाबाबत त्या महिन्याची एकाच वेळी देयके स्विकारली जातील. कंत्राटदाराच्या देय रक्कमेतुन नियमानुसार टि.डी.एस/जीएसटी कपात केली जाईल. १ जुलै २०१९ पासुन लागू जो.एस.टी. दर गृहित धरून कंत्राट दाराने वाहतुकीचा दर नमूद करावा व मान्य झालेल्या दराच्या व्यतिरिक्त अधिकची कोणतीही रक्कम देय राहणार नाही.

२७. दरपत्रक मंजूर/ नामंजूर करण्याबावतचा अंतिम निर्णयदरपत्रक निवडसमितीतसेच या संदर्भातील कोणत्याही अडचणीबाबतचा अंतिम निर्णय प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन छ संभाजीनगरविभाग छ संभाजीनगरयांचा राहील.

२८. कंत्राटदारास कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम अथवा अग्रिम देण्यात येणार नाही. तसेच कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची अट कार्यालयावर लादता येणार नाही.

२९. कार्यालयाच्या लेखी आदेशान्वये द्रवनत्र पुरवठा करणारे वाहन द्रवनत्र पुरवठा कामाव्यतिरिक्त कार्यालयाचे अन्य कामाकरीता जिल्हयाबाहेर व राज्याबाहेर न्यायचे झाल्यास मंजूर दरपत्रकानुसार नेण्यात येईल. रात्रीच्या मुक्कामाचा दर वेगळा देण्यात येणार नाही.

३०. कंत्राटदारास मान्य दराने द्रवनत्र व गोठित रेतमात्रा वाहतुक करण्याव्यतिरिक्त पशुसंवर्धन खात्याचे लसमात्रा, वैरणबियाणे, औषधी व विभागीय व्यवस्थापक अतिशीत रेत प्रयोगशाळा नागपूर या कार्यालयातील द्रवनत्र व गोठित रेतमात्रा व इतर आवश्यक शासकीय साधन सामुग्रीची वाहतूक करावी लागेल.

३१. दि.३०/०६/२०२६ नंतर नवीन दरकरार झाला नसल्यास संबधित कंत्राटदारास पुढील दरकरार होईपर्यंत किंवा ३ महिने (या पैकी जे आधी होईल) पर्यंत कामकाज करावे लागेल.

३२. शा.नि.वि.वि. संकिर्ण १०१०/प्र.क्र.६८/ कोशा/ प्र.५ दि. १८ एप्रिल २०११ च्या निर्देशानुसार पुरवठा देयकाची रक्कम RTGS प्रणालीव्दारे अदा करण्यात येईल. करीता पुरवठाधारकांनी बँक खाते क्र आधार क्र. आणि निरस्त धनादेश सादर करावे लागेल.

३३. ज्याचे दर सर्वात कमी असतील त्यांचे दरपत्रक मंजूर करणे हे निवड समितीवर बंधनकारक राहाणार नाही. निवड समिती जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम राहील व त्यास कोणताही आक्षेप घेता येणार नाही. न्यायालयीन प्रकरणी छ. संभाजीनगर उच्च न्यायालय हे कार्यक्षेत्र राहील.

**३४. एका व्यक्तीस केवळ एकच दरपत्रक सादर करता येईल. जर एका दरपत्रकधारकानेएका पेक्षा आधिक दरपत्रक सादर केले तर तो अपात्र ठरविण्यात येईल. एक किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दाखविता नाकारण्यांचा अधिकार निवड समितीच्या वतीने जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,** छ संभाजीनगर **यांनी राखून ठेवला आहे.**

(डॉ. एन.एस.कदम)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ,**
**छत्रपती संभाजीनगर**